**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 5.146
Volume - 5, Issue - 9, September - 2022 Publication Date: 30/09/2022

DOIs:10.2018/SS/202209006 --:-- Research Article

# पंधरावे वित्त आयोग आणि ग्रामीण पंचायतराज व्यवस्था

**डॉ. राजेंद्र धानाप्पा जेऊर**
**सहाय्यक प्राध्यापक (अर्थशास्त्र), मिरज महाविद्यालय, मिरज, जि. सांगली - ४१६४१० (महाराष्ट्र)**
Email - rajendrajeur@gmail.com

**गोषवारा:** संघराज्य पद्धती स्वीकारलेल्या, अतिरिक्त लोकसंख्या असणाऱ्या व भौगोलिक दृष्ट्या विस्तृत आणि वैविध्यता असणाऱ्या भारतासारख्या देशातील ग्रामीण जनतेला मुलभूत व अत्यावश्यक सेवा-सुविधा पुरविण्यामध्ये ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण ६८.१ टक्के होते. १९९२ मधील ७३ व्या घटनादुरुस्तीने ग्राम, तालुका व जिल्हा या तीनही स्तरावरील स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा दिलेला आहे व ११व्या परिशिष्टातील २९ कार्यांची/घटकांची जबाबदारी त्यांच्यावर सोपविलेली आहे. असे असले तरी या स्थानिक स्वराज्य संस्था आपली कर्तव्ये प्रभावीपणे, कार्यक्षमपणे पार पाडण्यास असमर्थ आहेत असे आढळून येते. याचे मुख्य कारण म्हणजे या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांकडे असणाऱ्या जबाबदाऱ्यांची पूर्तता करण्यासाठी लागणाऱ्या आर्थिक साधनांची कमतरता अर्थात अपर्याप्तता होय. याच पार्श्वभूमीवर १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशिंचा व तदनुसार २०२१ ते २०२६ या कालावधीत ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना प्राप्त होणाऱ्या अनुदानाबाबतचा आढावा व अभ्यास प्रस्तुत लेखात केलेला आहे.

**वाक्यांश:** वित्त आयोग, घटनादुरुस्ती,स्थानिक स्वराज्य संस्था, पंचायतराज, निधी, अनुदान.

## 1. प्रस्तावना:

भारत एक संघराज्य असून भारताची लोकसंख्या वाढत आहे. २०११च्या जनगणनेनुसार भारतातील ६८.१ टक्के लोक ग्रामीण भागात राहतात. भारत हा भौगोलीकदृष्ट्या विस्तृत आणि वैविध्यता संपन्न देश आहे. अशा देशामधील ग्रामीण जनतेला मुलभूत व अत्यावश्यक सेवा-सुविधा प्रभावी व कार्यक्षमपणे पुरविण्यामध्ये ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांचे म्हणजे पंचायत राज संस्थांचे महत्व अनन्यसाधारण असे आहे. सत्तेचे विकेंद्रीरण करून ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना विविध घटनात्मक अधिकार प्रदान करण्याच्या हेतूने १९९२ मध्ये ७३ वी राज्यघटना दुरुस्ती केली व तदनुषंगाने कायदा केला व त्या कायद्याची अंमलबजावणी २४ एप्रिल १९९३ पासून सुरु झाली. हा घटनादुरुस्ती कायदा म्हणजे भारताच्या ग्रामीण विकासातील एक मैलाचा दगड आहे. या घटनादुरुस्तीने घटनेतील परिशिष्ट ११ मधील २९ कार्यांची जबाबदारी पंचायत राज व्यवस्थेकडे सोपविली. यामध्ये प्रामुख्याने, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, गृहबांधणी, ग्रामीण विध्युतीकरण, दारिद्य निर्मुलन, खादी व ग्रामीण उद्योग, अपारंपारिक उर्जा, कुटुंब कल्याण, महिला व बालकल्याण, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, सार्वजनिक संपत्तीचे संवर्धन व देखभाल इ. अनेक घटकांचा समावेश करण्यात आला. या कार्यांच्या पुर्ततेसाठी राज्यघटनेतील अनुच्छेद २४३ ***ज*** नुसार राज्य विधिमंडळ कायदा करून ग्रामीण पंचायत राज संस्थांना काही कर आकारण्याचे, कर गोळा करण्याचे अधिकार देऊ शकते व राज्याच्या एकत्रित निधीतून निधी देऊ शकते. त्याचप्रमाणे राज्यघटनेतील अनुच्छेद २४३ ***झ*** नुसार राज्याचा राज्यपाल पाच वर्षाच्या कालावधीसाठी राज्य वित्तीय आयोगाची नियुक्ती करू शकतात. हे आयोग पंचायत राज संस्थांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी शिफारशी करू शकतात. या पार्श्वभूमीच्या आधारावर प्रस्तुत शोधनिबंधात १५व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना आर्थिक वर्ष २०२१-२२ ते २०२५-२६ कालावधीत मिळणाऱ्या विविध अनुदानांचा अभ्यास करण्याचा एक प्रयत्न केला आहे.

## 2. १५व्या वित्त आयोगाचे दोन अहवाल आणि वाढता कालावधी:

वास्तविकपणे १५व्या वित्त आयोगाचा अहवाल राष्ट्रपतींकडे सादर करण्याचा कालावधी ३१ डिसेंबर २०१९ हा होता. परंतु तो कालावधी सुमारे एक वर्षापर्यंत वाढविला गेला आणि नोव्हेंबर २०२० च्या प्रारंभी सादर केला. या आयोगाने दोन स्वतंत्र अहवाल सादर केले; पैकी एक अहवाल वर्ष २०२०-२१ साठी होता तर दुसरा अहवाल वर्ष २०२१-२२ ते २०२५-२६ या पाच वर्षाच्या कालावधीसाठी होता. असे होण्याचे कारण म्हणजे त्यावेळी देशात अशी अनिश्चितता होती की जी या वित्त आयोगाच्याही नियंत्रणाबाहेर होती. त्याचे पहिले करण असे होते की, देशातील बचत व गुंतवणुकीची पातळी खालावलेली होती, बेरोजगारीचे

प्रमाण वाढलेले व वाढतच होते, बँकिंग क्षेत्र एन.पी.ए.च्या आर्थिक पेचात सापडले होते, केंद्र व राज्य सरकार दोहोंनाही विशेषत: सामाजिक विकासासाठी वित्तीय साधनांची कमतरता भासत होती. दुसरे कारण म्हणजे जी.एस.टी. प्रणालीचा अवलंब केला होता परंतु त्याचे दर, आकारणी पद्धत, नोंदणी पद्धत याबाबतीत लोकांमध्ये स्पष्टता, आत्मविश्वास नव्हता व खरे म्हणजे यासाठीची तांत्रिक संरचानात्मक व्यवस्था परिपूर्णपणे स्थापित झाली नव्हती पण सरकारच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन मात्र जी.एस.टी. हेच होते. राज्य सरकारांचे केंद्राकडून येणे रक्कम नियमितपणे व वेळेवर मिळण्यामध्ये अनेक अडचणी निर्माण झाल्या होत्या. तिसरे कारण म्हणजे मे २०१९ मध्ये लोकसभेच्या निवडणुका जाहीर झाल्यामुळे निवडणूक आचारसंहिता लागू होती. चौथे कारण म्हणजे ५ ऑगस्ट २०१९ रोजी जम्मू व काश्मीर या राज्याचे विभाजन करून दोन नवीन केंद्रशासित प्रदेशांची निर्मिती करण्यात आली होती.पाचवे कारण म्हणजे देशाचे संरक्षण आणि अंतर्गत सुरक्षा याबाबत स्वतंत्र निधीची उभारणी करता येईल काय? याविषयीच्या संदर्भ अटीचा नव्याने समावेश करण्यात आला होता व त्याबाबत विचार करण्याची जबाबदारीही या आयोगाकडे होती.

## 3. वित्त आयोग आणि निधी हस्तांतरण:

ग्रामीण पंचायत राज संस्थांना घटनात्मक अधिकार मिळून व परिशिष्ट ११ नुसार २९ कार्यांची जबाबदारी स्वीकारून जवळ-जवळ ३०वर्षे पूर्ण होत आली असली तरी त्यांच्या घटनात्मक व कायदेशीर कार्यकक्षेत येणाऱ्या कर्तव्यांची/जबाबदाऱ्यांची कार्यक्षमपणे पुर्तता करणे अध्यापही त्यांना शक्य झाले नाही. याचे प्रमुख करण म्हणजे कमी पडणारा निधी अर्थात उत्पन्नाची अपर्याप्त साधने हे होय. भारतातील केंद्र आणि राज्य सरकारकडून ग्रामीण पंचायत राज संस्थांना प्राप्त होणारा अथवा हस्तांतरित होणारा अपुरा निधी आणि या स्थानिक स्वराज्य संस्थांची अपुरी व मर्यादित स्व-उत्पन्नाची साधने ही त्यांच्या समोरील वर्तमान आव्हाने बनली आहेत. याचा परिणाम म्हणजे ग्रामीण पंचायत राज संस्थांचे सरकारवरील अवलंबन वाढत आहे.

- **केंद्रीय वित्त आयोग आणि ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांचा निधी (को. रु.)**

| वित्त आयोग क्रमांक | कालावधी | हस्तांतरित निधी रक्कम (प्रस्तावित) | प्रत्यक्षात मिळालेला निधी |
|---|---|---|---|
| १०वे | १९९५-२००० | ४,३८१ | ३,५७६ |
| ११वे | २०००-२००५ | ८,००० | ६,६०२ |
| १२वे | २००५-२०१० | २०,००० | १८,९२९ |
| १३वे | २०१०-२०१५ | ६४,४०८ | ५८,२५७ |
| १४वे | २०१५-२०२० | २,००,२९२ | १७,९४९१ |
| १५वे | २०२१-२०२६ | २,३६,८०५ | ---- |

संदर्भ- Finance Commission in Covid Times: Report for 2021-26 P.172.

## 4. भारतातील ग्रामीण पंचायत राज संस्थांची संख्या:

भारतात एकूण २,६३,०६२ ग्रामीण स्वराज्य संस्था आहेत. त्यापैकी ६६० जिल्हा परिषदा, ६८३६ पंचायत समित्या आणि २,५५,५६६ ग्रामपंचायत आहेत. उत्तरप्रदेश मध्ये सर्वात जास्त म्हणजे २२.४६ टक्के (५९,०९०) ग्रामीण स्वराज्य संस्था आहेत. महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर असून तेथे १०.७४ टक्के (२८,२७४), तर मध्यप्रदेश तिसऱ्या क्रमांकावर म्हणजे तेथे ८.७९ टक्के (२३,१४६), तर गुजरात चौथ्या क्रमांकावर म्हणजे तेथे ५.५२ टक्के (१४,५३८), तर आंध्र प्रदेश पाचव्या क्रमांकावर म्हणजे तेथे ५.३३ टक्के (१४,०४४) ग्रामीण स्वराज्य संस्था आहेत. देशातील एकूण ग्रामीण स्वराज्य संस्थांपैकी ९७ टक्के पेक्षा जास्त प्रमाण ग्रामपंचायतींचे आहे. हे तक्ता क्रमांक १ मध्ये दर्शविले आहे.

- **तक्ता नं. १ भारतातील ग्रामीण पंचायत राज संस्था**

| • राज्ये | जिल्हा पंचायतींची संख्या | मध्यवर्ती पंचायतींची संख्या | ग्रामपंचायतींची संख्या | एकूण |
|---|---|---|---|---|
| आंध्र प्रदेश | १३ | ६६० | १३३७१ | १४०४४ |
| अरुणाचल प्रदेश | २५ | १७८ | २१०६ | २३०९ |
| आसाम | २६ | १९२ | २१९७ | २४१५ |
| बिहार | ३८ | ५३४ | ८३८७ | ८९५९ |
| छत्तीसगड | २७ | १४६ | ११६५८ | ११८३१ |
| गोवा | २ | लागू नाही | १९१ | १९३ |
| गुजरात | ३३ | २४८ | १४२५७ | १४५३८ |
| हरियाणा | २१ | १२६ | ६२३४ | ६३८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| हिमाचल प्रदेश | १२ | ८१ | ३६१५ | ३७०८ |
| झारखंड | २४ | २६३ | ४३५९ | ४६४६ |
| कर्नाटक | ३० | २२७ | ६००६ | ६२६३ |
| केरळ | १४ | १५२ | ९४१ | ११०७ |
| मध्य प्रदेश | ५१ | ३१३ | २२७८२ | २३१४६ |
| महाराष्ट्र | ३४ | ३५१ | २७८८९ | २८२७४ |
| मणिपूर | ६ | लागू नाही | १६१ | १६७ |
| मेघालय | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| मिझोराम | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| नागालँड | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| ओडिशा | ३० | ३१४ | ६७९८ | ७१४२ |
| पंजाब | २२ | १५१ | १३२६३ | १३४३६ |
| राजस्थान | ३३ | ३५२ | ११३४१ | ११७२६ |
| सिक्कीम | ४ | लागू नाही | १८५ | १८९ |
| तामिळनाडू | ३७ | ३८८ | १२५२५ | १२९५८ |
| तेलंगणा | ३२ | ५४० | १२७६९ | १३३४१ |
| त्रिपुरा | ८ | ३५ | ५९१ | ६३४ |
| उत्तर प्रदेश | ७५ | ८२६ | ५८१८९ | ५९०९० |
| उत्तराखंड | १३ | ९४ | ७७०२ | ७८०९ |
| पश्चिम बंगाल | २२ | ३४२ | ३३४० | ३७०४ |
| • केंद्रशासित प्रदेश | | | | |
| अंदमान आणि निकोबार बेटे | २ | ७ | ७० | ७९ |
| चंदीगड | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| दिल्ली | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| जम्मू आणि काश्मीर | २० | २७५ | ४२९० | ४५८५ |
| लडाख | २ | ३१ | १९३ | २२६ |
| लक्षद्वीप | १ | लागू नाही | १० | ११ |
| पुडुचेरी | लागू नाही | १० | १०८ | ११८ |
| दादरा व नगर हवेली आणि दमण व दीव | ३ | लागू नाही | ३८ | ४१ |
| एकूण | ६६० | ६८३६ | २५५५६६ | २६३०६२ |

- **केंद्रीय वित्त आयोगाकडून ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी राज्यांना मिळणारे अनुदान**

**(रु.कोटीमध्ये)**

| राज्ये | १३ वा वित्त आयोग | ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या एकूण अनुदानापैकी राज्यांचा वाटा | १४ वा वित्त आयोग | ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या एकूण अनुदानापैकी राज्यांचा वाटा | १५ वा वित्त आयोग | ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या एकूण अनुदानापैकी राज्यांचा वाटा |
|---|---|---|---|---|---|---|
| आंध्र प्रदेश | ५२२६.२ | ८.२९% | ८६५४.०९ | ४.३२% | १०२३१ | ४.३२% |
| अरुणाचल प्रदेश | २७४.१ | ०.४३% | ८१९.९२ | ०.४१% | ९०० | ०.३८% |
| आसाम | १५७७.४ | २.५०% | ५४१६.५८ | २.७०% | ६२५३ | २.६४% |
| बिहार | ४९५४.५ | ७.८६% | २१०१७.८३ | १०.४९% | १९५६१ | ८.२६% |
| छत्तीसगड | १६७०.७ | २.६५% | ५२४४.१३ | २.६२% | ५६६९ | २.३९% |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| गोवा | ९०.१ | ०.१४% | १३३.७७ | ०.०७% | २९३ | ०.१२% |
| गुजरात | २३३२.८ | ३.७०% | ८६३४.७३ | ४.३१% | १२४५५ | ५.२६% |
| हरियाणा | १०८६.७ | १.७२% | ३८८८.५२ | १.९४% | ४९२९ | २.०८% |
| हिमाचल प्रदेश | ५५६.९ | ०.८८% | १८०९.८ | ०.९०% | १६७३ | ०.७१% |
| झारखंड | १५१६.६ | २.४१% | ६०४९.७४ | ३.०२% | ६५८५ | २.७८% |
| जम्मू आणि काश्मीर | ९१८.३ | १.४६% | ३४६३.७३ | १.७३% | लागू नाही | लागू नाही |
| कर्नाटक | ४५०४.८ | ७.१४% | ९२८८.६६ | ४.६४% | १२५३९ | ५.२९% |
| केरळ | १९५०.२ | ३.०९% | ४०१७.६१ | २.०१% | ६३४४ | २.६८% |
| मध्य प्रदेश | ४११३.८ | ६.५२% | १३५५६.३६ | ६.७७% | १५५२७ | ६.५६% |
| महाराष्ट्र | ५४९८.६ | ८.७२% | १५०३५.६८ | ७.५१% | २२७१३ | ९.५९% |
| मणिपूर | २१९.२ | ०.३५% | २०६.०४ | ०.१०% | ६९० | ०.२९% |
| मेघालय | ३१३ | ०.५२% | लागू नाही | लागू नाही | ७११ | ०.३०% |
| मिझोराम | २०१.३ | ०.३२% | लागू नाही | लागू नाही | ३६२ | ०.१५% |
| नागालँड | ३०५.४ | ०.४८% | लागू नाही | लागू नाही | ४८६ | ०.२१% |
| ओडिशा | २५९१.२ | ४.११% | ८८५०.३१ | ४.४२% | ८८०० | ३.७२% |
| पंजाब | ११२५.१ | १.७८% | ४०९१.१३ | २.०४% | ५४१० | २.२९% |
| राजस्थान | ३९३८.७ | ६.२५% | १३६३३.६३ | ६.८१% | १५०५३ | ६.६३% |
| सिक्कीम | १८४.५ | ०.२९% | १४८.४९ | ०.०७% | १६५ | ०.०७% |
| तामिळनाडू | ३०८३.९ | ४.८९% | ८७७७.४३ | ४.३८% | १४०५९ | ५.९४% |
| तेलंगणा | लागू नाही | लागू नाही | ५३७५.२८ | २.६८% | ७२०१ | ३.०४% |
| त्रिपुरा | २९३.४ | ०.४७% | ३३५.६८ | ०.१७% | ७४६ | ०.३१% |
| उत्तर प्रदेश | ९७८७.७ | १५.५२% | ३५७७६.५६ | १७.८६% | ३८०१२ | १६.०५.% |
| उत्तराखंड | ५९१ | ०.९४% | १८८२.६९ | ०.९४% | २२३९ | ०.९५% |
| पश्चिम बंगाल | ४१४४.३ | ६.५७% | १४१९१.७८ | ७.०९% | १७१९९ | ७.२६% |
| **एकूण** | **६४,४०८** | **१००%** | **२,००,२९२** | **१००%** | **२३६८०५** | **१००%** |

## 5. अनुदान प्राप्तीच्या पूर्व अटी:

१५व्या वित्त आयोगाने काही पूर्व अटींच्या आधारावर ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदानाचे वाटप केले जाईल असे नमूद केले आहे. ७३ व्या घटनादुरुस्तीतील तरतुदीनुसार राज्यघटनेतील अनुच्छेद २४३ ***झ*** नुसार राज्याचा राज्यपाल पाच वर्षाच्या कालावधीसाठी राज्य वित्तीय आयोगाची नियुक्ती करू शकतो. त्या प्रमाणे प्रत्येक राज्याने राज्य वित्तीय आयोगाची नियुक्ती केली असली पाहिजे आणि त्यांच्या सिफारशिंनुसार मार्च २०२४ पूर्वी त्यांची अंमलबजावणी सुरु केली असली पाहिजे, अन्यत: सन २०२४-२५ आणि २०२५-२६ या दोन वर्षाचे अनुदान वाटप केले जाणार नाही. परंतु वस्तुस्थिती अशी दिसते की, राजस्थान, आसाम,पंजाब आणि बिहार या चार राज्यांमध्ये आजपर्यत सहा राज्य वित्त आयोगांची तर उत्तरप्रदेश, तामिळनाडू, उत्तराखंड, त्रिपुरा, हरियाना, केरळ, ओरिसा, हिमाचल प्रदेश, महाराष्ट्र, सिक्कीम आणि मध्य प्रदेश या राज्यांमध्ये पाच वित्त आयोगांची नियुक्ती केली आहे. मणिपूर, गोवा, झारखंड, छत्तीसगड व गुजरात या राज्यांमध्ये फक्त तीन राज्य वित्त आयोगांची नियुक्ती केली आहे. ७३ व्या घटनादुरुस्तीतील तरतुदीनुसार प्रत्येक राज्याने प्रत्येक पाच वर्षासाठी राज्य वित्तीय आयोगाची नियुक्ती केली पाहिजे व त्यांच्या शिफारशींची वेळेवर अंमलबजावणी झाली पाहिजे याचा आग्रह १५व्या वित्त आयोगाने धरला आहे. पुढची अट अशी आहे कि, प्रत्येक ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेने आपल्या हिशेबांची वेळेवर हिशेब तपासणी / अंकेक्षण करून घेतले पाहिजे व २०२०-२१ पासून पुढे तो हिशेब व अंकेक्षण अहवाल सर्वांसाठी संस्थेच्या संकेत स्थळावर उपलब्ध करून दिला पाहिजे. ही बाब यासाठी महत्वाची आहे की, यापूर्वीच्या वित्त आयोगांना असा हिशेब उपलब्ध नसल्यामुळे या स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी नेमक्या किती निधीची गरज आहे? याचे आकलन होत नव्हते. अर्थात योग्य प्रमाणात निधी उपलब्ध न होण्यामध्ये हिशेब व अंकेक्षण अहवालाची कमतरता हे ही एक कारण आहे.

## 6. १५व्या वित्त आयोगाची ठळक वैशिष्ट्ये:

१५व्या वित्त आयोगाची इतर काही महत्वाची वैशिष्ट्ये म्हणजे या आयोगाने ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना द्यावयाच्या अनुदानाची दोन मुख्य गटामध्ये विभागणी केली आहे.

१. **मुलभूत अनुदान/निधी** की ज्यामध्ये एकूण निधीच्या ४० टक्के म्हणजे ९४,७२१ को. रु.चा समावेश आहे. ही रक्कम वेतन आणि इतर आस्थापना खर्चा व्यतिरिक्त असून जे २९ विषय ११ व्या परिशिष्टात नमूद आहेत त्यांच्यावरती खर्च करावयाचे आहे. हा निधी खर्च करण्यासाठी ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना कोणत्याही प्रकारची बंधने अथवा अटी/शर्ती असणार नाहीत.

२. **बद्ध/बंधित अनुदान** की ज्यामध्ये एकूण निधीच्या ६० टक्के म्हणजे १,४२,०८४ को. रु.चा समावेश आहे. हा निधी मात्र राष्ट्रीय प्राधान्य कार्यक्रमांच्या पुर्ततेसाठीच खर्च केला पाहिजे असे बंधन आहे. या बद्ध/बंधित अनुदानाची विभागणी पुन्हा दोन उपगटात केलेली आहे. अ) एकूण निधीपैकी पैकी ५० टक्के म्हणजे ७१०४२ को.रु. पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, पावसाच्या पाण्याची साठवण, पाण्याचे पुनर्वापर यासाठी खर्च केले पाहिजे. ब)उर्वरित ५० टक्के म्हणजे ७१०४२ को.रु. स्वच्छता, घनकचरा व शौचालय बांधणी अर्थात उघडयावरील शौच बंद करणे यासाठी खर्च करणेचे आहे. वरील राष्ट्रीय प्राधान्य कृती कार्यक्रमासाठी खर्च करण्यामुळे संयुक्त राष्ट्र संघटनेच्या शास्वत/चिरंतन विकास साध्य करण्याच्या दृष्टीने जी १७ सहस्रक उद्दिष्ट्ये २०३० पर्यंत पूर्ण करावयाची आहेत त्यातील ६ वे म्हणजे सर्वांसाठी शुद्ध पाणी आणि स्वच्छता हे उद्दिष्ट साध्य करण्याप्रतचे एक सकारात्मक पाऊल ठरणार आहे. १५व्या वित्त आयोगाने शिफारस केलेली बद्ध/बंधित निधी हे १३व्या आणि १४ व्या वित्त आयोगाने शिफारस केलेल्या कामगिरीवर आधारित अनुदानापेक्षा काही प्रमाणात वैविध्यपूर्ण असे आहे.

३. **तीनही स्तरावरील स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान:** १४ व्या वित्त आयोगाने जिल्हा परिषद/ पंचायत, पंचायत समिती/तालुका गट पंचायत यांना अनुदान वाटप न करता फक्त थेट ग्रामपंचायतींना अनुदान वाटप करण्याविषयी शिफारस केली होती. तथापि, ७३ व्या घटनादुरुस्तीने ग्राम, तालुका व जिल्हा पातळीवरील अनुक्रमे ग्रामपंचायत, पंचायत समिती/तालुका गट पंचायत आणि जिल्हा परिषद/ जिल्हा पंचायत या तीनही स्तरावरील स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा दिलेला आहे. त्यामुळे १५ व्या वित्त आयोगाने या तीनही स्तरावरील स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान वाटप करण्याची शिफारस केली आहे. याशिवाय राज्यघटनेतील परिशिष्ट ५ व ६ मध्ये नमूद केलेल्या विभागांनासुद्धा अनुदान वाटप करण्याची शिफारस केली आहे.

## 7. निष्कर्ष :

१५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशींचे वास्तव परिणाम येणाऱ्या वर्षांमध्ये दिसून येतील; कारण त्यांची अंमलबजावणी कोविड -१९ च्या प्रदुर्भावाच्या काळात सुरु झालेली आहे की ज्याची झळ समाजातील सर्व थरातील लोकांना बसलेली आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे १५व्या वित्त आयोगाच्या शिफारशींद्वारे मिळणारे अनुदान हे काही सुधारणात्मक अटींच्या पूर्ततेवर आधारित आहे. त्या प्रस्तावित सुधारणा ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांनी केल्यास, प्रत्यक्ष अंमलात आणल्यास प्रशासन प्रभावी व अधिक सामाजिक बांधिलकी जोपासणारी अशी ठरणार आहे की ज्याची अपेक्षा या पूर्वीच्या वित्त आयोगांनीही केली होती. त्यामुळे पुन्हा ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांचा विकासातील सहभाग अधिक अधोरेखित होणार आहे.

१५ व्या वित्त आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या अनुदानाचा वापर काही राष्ट्रीय उद्दिष्ट्ये साध्य करण्याच्या दृष्टीकोनातूनही करावयाचा आहे. या सर्वांचा परिपाक म्हणजे संयुक्त राष्ट्रसंघाने २०३० पर्यंत शाश्वत विकास साध्य करण्याच्या दृष्टीने जी उद्दिष्टे निश्चित केलेली आहेत, त्या उद्दिष्टांप्रत ही सकारात्मक वाटचाल असेल.

## संदर्भ:

१. चौधरी, राजेश. (जानेवारी, २०१६). *भारताचे संविधान*, पहिली आवृत्ती. चौधरी लॉ पब्लिशर्स, जळगांव-पुणे.
२. Sadashivan T. and Shahla T., (Feb.2022), 15th Finance Commission: Transforming Rural Local Governments (Panchayats) in India, Third Concept, p. 167-171.
३. Ministry of Panchayat Raj, Government of India (October, 2020). *Finance Commission in Covid Times: Report for 2021-26*, Volume-I Main Report.
४. Isaac, T. M. T., Mohan, R. and Chakraborty, L., (7 Nov. 2020), Fifteenth Finance Commission Award for 2020-21- Implications for the States, *Economic and Political Weekly,* Vol. 55, Issue No,45.
५. Pinaki Chakraborty, (26-August-2021), COVID-19 Context and the Fifteenth Finance Commission: Balancing Fiscal Need and Macroeconomic Stability, *NIPFP (National Institute of Public Finance and Policy*, New Delhi, Working Paper No.351.
६. Chakraborty, P. and Gupta, M. (26 November, 2021), Terms of reference of the Fifteenth Finance Commission, In Rajesh Raj, S. N. Singha, K.(Eds), *The Routledge Handbook of Post-Reform Indian Economy*, Chapter 12.
७. Bhaskar, V. (March 10, 2018). Challenges before the Fifteenth Finance Commission, *Economic & Political Weekly (EPW)*, Vol LIII, Issue No 10.
८. https://www.panchayat.gov.in/documents/retrieved on Sept. 20, 2022, at 22.10 pm.